सन २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीत समन्वयीत कृषि विकास प्रकल्पासाठी मुख्य लेखाशीर्ष ६४२५ याखाली उपलब्ध झालेल्या अनुदानाचे लेखांकन वर्गीकृत नोंदीद्वारे २४३५ या मुख्य लेखाशीर्षाखाली करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृपमं-०६१७/प्र.क्र.१२७/२१-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः बासप्र-२००८/प्र.क्र.४८/२१-स, दि.१३.८.२००९
२. प्रकल्प संचालक, समन्वयित कृषि विकास प्रकल्प, अमरावती यांचे क्र.सी.ए.आय.एम./ २०१७-१८/५५८६, दि.०५.०६.२०१७ चे पत्र
३. Director, Asia and the Pacific Division यांचे दि. ०२.०५.२०१७ रोजीचे पत्र.
४. महालेखाकार कार्यालयाचे पत्र क्र. युओआर-८२/२०१७-१८/७६६, दि. २९.११.२०१७
५. सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाचे ज्ञापन क्रमांक आसुअं-२०१८/प्र.क्र.१४/२०१८/१७स, दिनांक १७.०३.२०१८

प्रस्तावना :-

आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी (IFAD) या संस्थेच्या सहकार्याने विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी ग्रस्त असलेल्या सहा जिल्हयांमध्ये समन्वयित कृषि विकास प्रकल्प (CAIM) राबविण्यात येत असून प्रकल्प दि.४.१२.२००९ पासून कार्यान्वित झाला आहे. संदर्भ क्रमांक ३ येथील Director, Asia and the Pacific Division यांच्या पत्रानुसार सदर प्रकल्पाचा कालावधी ३१.१२.२०१८ पर्यंत वाढविण्यात (Extension) आला आहे.

आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी सहाय्यित समन्वयीत कृषि विकास प्रकल्पाकरीता सन २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीत मुख्य लेखाशीर्ष ६४२५- सहकारासाठी कर्जे यामधून प्रकल्पास उपलब्ध करुन देण्यात आलेले अनुदान हे प्रकल्पाच्या मूळ उद्दिष्टाशी सुसंगत नव्हते. सदर अनुदानाचे व खर्चाचे लेखांकन प्रकल्पासाठी सध्या अस्तित्वात असलेले मुख्य लेखाशीर्ष २४३५- इतर कृषिविषयक कार्यक्रम या लेखाशीर्षामध्ये होणे आवश्यक आहे. जेणेकरून सदर अनुदानाच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या खर्चाच्या लेखांकनामध्ये संदिग्धता अथवा कर्ज परतफेडीबाबत प्रश्न उद्भवणार नाही.

समन्वयीत कृषि विकास प्रकल्पासाठी सन २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीत मुख्य लेखाशीर्ष ६४२५- सहकारासाठी कर्जे या लेखाशीर्षांतर्गत ५५ - कर्जे व आगाऊ रकमा या तपशीलवार शीर्षामधून राज्य हिस्सा लेखाशिर्ष ६४२५०६४५ रु. १२५.०० लाख व बाह्य हिस्सा लेखाशिर्ष ६४२५०६६३ रु. ४५५.९१ लाख असे एकूण रुपये ५८०.९१ लाख अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले

आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी, भारत सरकार व राज्य शासन यांचेमध्ये झालेल्या करारानुसार सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र.बासप्र-२००८/प्र.क्र.४८/२१-स, दिनांक १३.०८.२००९ अन्वये सदर प्रकल्पास मान्यता देण्यात आली. तसेच प्रकल्पाचे स्वरुप विचारात घेऊन आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी कडून मिळणारे अर्थसहाय्य (बाहय हिस्सा) व राज्य शासनाकडील हिस्सा यासाठी लेखाशिर्ष २४३५- इतर कृषिविषयक कार्यक्रम हे नवीन स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्यात आले असून, ३२ - अंशदाने राज्य हिस्सा लेखाशिर्ष २४३५००३५ रु. १२५.०० लाख व बाह्य हिस्सा लेखाशिर्ष २४३५००४४ रु. ४५५.९१ लाख असे एकूण रुपये ५८०.९१ लाख या मुख्य लेखाशीर्षाखाली करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

समन्वयीत कृषि विकास प्रकल्पाच्या सन २००८-०९ ते सन २०१०-११ या कालावधीत लेखाशिर्ष ६४२५- सहकारासाठी कर्ज या मुख्य लेखाशीर्षाखाली ५५- कर्जे व आगाऊ रकमा या तपशीलवार लेखाशीर्षांतर्गत लेखांकित झालेल्या अनुदानाचे व खर्चाचे वर्गीकरण अर्थसंकल्पीय अधिवेशनात पूरवणी मागणीद्वारे मंजूर झालेला निधी राज्य हिस्सा लेखाशिर्ष ६४२५०६४५ रु. १२५.०० लाख व बाह्य हिस्सा लेखाशिर्ष ६४२५०६६३ रु. ४५५.९१ लाख असे एकूण रुपये ५८०.९१ लाख प्रकल्पाचे सध्याचे मुख्य लेखाशीर्ष २४३५ - इतर कृषि विषयक कार्यक्रम ३२- अंशदाने राज्य हिस्सा लेखाशिर्ष २४३५००३५ रु. १२५.०० लाख व बाह्य हिस्सा लेखाशिर्ष २४३५००४४ रु. ४५५.९१ लाख असे एकूण रुपये ५८०.९१ लाख या लेखाशिर्षाखाली वर्गीकृत नोंदीद्वारे (Transfer Entry) पुस्तकी समायोजन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी **श्री. का.गो. वळवी, उप सचिव,** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना **नियंत्रण अधिकारी** म्हणून व **श्री. र.गं.बोड्डू, कार्यासन अधिकारी,** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना **आहरण व संवितरण अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली राज्य हिस्सा लेखाशिर्ष ६४२५०६४५ रु. १२५.०० लाख व बाह्य हिस्सा लेखाशिर्ष ६४२५०६६३ रु. ४५५.९१ लाख असे एकूण रुपये ५८०.९१ लाख इतकी रक्कम पुस्तकी समायोनाद्वारे समायोजित करुन प्रकल्पाचे सध्याचे मुख्य लेखाशीर्ष २४३५ - इतर कृषि विषयक कार्यक्रम ३२- अंशदाने राज्य हिस्सा लेखाशिर्ष २४३५००३५ रु. १२५.०० लाख व बाह्य्र हिस्सा लेखाशिर्ष २४३५००४४ रु. ४५५.९१ लाख असे एकूण रुपये ५८०.९१ लाख (रुपये पाच कोटी ऐंशी लाख एक्यान्नव हजार फक्त) इतकी रक्कम या लेखाशिर्षाखाली जमा दाखवावी.

सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने नियोजन विभागाचे अनौसं क्र. १०८/१४३१ दिनांक १४.०९.२०१७ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४५४/१७/व्यय-२ व अनौ-६४/ऋण व हमी कक्ष दिनांक १७.१०.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०३२८१८१५४२५००२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Valvi Kalu Gonya

Digitally signed by Valvi Kalu Gonya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op,Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, cn=Valvi Kalu Gonya
Date: 2018.03.31 11:14:11 +05'30'

(का. गो. वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान सभा / परिषद, विधान भवन, मुंबई
२. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (पणन/ वित्त/नियोजन), मंत्रालय, मुंबई
५. उप सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रकल्प संचालक (CAIM), विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती
७. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), मुंबई
८. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), नागपूर
९. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१०.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
११.अवर सचिव / कक्ष अधिकारी(रोखशाखा/१७-स),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.निवडनस्ती